सन २०१७-१८ करीता इको टुरि झम (राज्य) योजनेंतर्गत चंद्रपूर वनवृत्तातील उथळपेठ गायमुख निसर्ग पर्यटन स्थळ, चिचपल्ली या **पर्यटन स्थळांच्या विकास कामांकरिता निधी वितरण. (२४०६ २२९५)**

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांक : निसप-२०१७/ प्र.क्र.१५१/फ- ५

मंत्रालय, मुंबई -४००० ०३२

दिनांक :- २ नोव्हेंबर २०१७

वाचा - १) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य,नागपूर यांचे पत्र क्रं. कक्ष-१/ पी/यो/नबाप्र/प्र.क्र.१५/१४०९/२०१७-१८,दि. २४/१०/२०१७

२) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७ /प्र.क्र.९४/अर्थ-३ दि.३०/६/२०१७.

प्रस्तावना -

अप्पर प्रधान मुख्य वन संरक्षक (अर्थसंकल्प,नियोजन व विकास) महाराष्ट्र राज्य नागपुर यांनी संदर्भाधीन पत्रान्वये सन २०१७-१८ करिता इको टुरीझम राज्य योजनेंतर्गत वनक्षेत्रातील पर्यटन स्थळांचा विकास या योजनेंतर्गत औरंगाबाद वनवृत्तातील औंढा नागनाथ या पर्यटन स्थळाच्या विकास कामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबतचा नविन बाब प्रस्ताव संदर्भीय पत्रान्वये शिफारशीसह सादर केला आहे.

शासन निर्णय दि. २८.०१.२०१६ अन्वये महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या उपविधी नियमांना मान्यता प्रदान केली आहे. त्यामध्ये व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन मंडळ, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली गठीत कार्यकारी समितीने प्रस्तावित सर्व पर्यटन स्थळाच्या विकास कामांना निधी उपलब्ध करुन देण्याची शिफारस केली आहे.

राज्य योजना सन २०१७-१८ करीता इको टुरीझम (राज्य) योजनेंतर्गत वनक्षेत्रातील पर्यटन स्थळांचा विकास (२४०६-२२९५) या योजनेअंतर्गत रू.८०००.०० लक्ष इतका निधी अर्थसंकल्पित आहे. या निधीतून प्रस्तावित पर्यटन स्थळांचा विकास करण्यासाठी निधी मंजुर करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता .

शासन निर्णय :-

अपर प्रधान मुख्य वन संरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य,नागपुर यांनी प्रस्तावित केल्यानुसार औरंगाबाद वनवृत्तातील औंढा नागनाथ या पर्यटन स्थळांचा विकास करण्यासाठी **रु.८८.०१ लक्ष (अठ्याऐंशी लक्ष एक हजार फक्त)** इतक्या रक्कमेची खाली नमुद केल्याप्रमाणे विकास कामे करण्यास नमुद अटी व शर्तीचे अधिन राहून मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

(रक्कम लाखात)

अ.क्र.	कार्यान्वयन यंत्रणा	विकास कामाचा तपशिल	एकुण अपेक्षित खर्च
१	मुख्य वनसंरक्षक (प्रा) औरंगाबाद	नैसर्गीक पाऊलवाट तयार करणे	रु. २.९९
२		माहीती दर्शक फलक तयार करणे	रु. २.७६
३		रस्त्याच्या बाजुला असणाऱ्या वृक्षाची माहीती दर्शक फलक तयार करणे	रु. ३.००
४		निरिक्षण मनोरा उभारणे	रु. ५.९८

५		नाला खोलीकरण करणे	रु.२.२६
६		वनतळे-१	रु. १.९७
७		वनतळे-२	रु. २.११
८		वनचेतना केंद्रामध्ये पोस्टर्स लावणे	रु. ३.००
९		वनचेतना केंद्रामध्ये दृकश्राव्ये साधने खरेदी करणे	रु. ३.००
१०		वनपर्यटन प्रवेशद्वार,सोलार लाईट	रु. ३.००
११		वननिरीक्षण कुटी	रु. १०.००
१२		वनग्रंथालय पुस्तक खरेदी करणे ५००नग	रु. २.९८
१३		वनपर्यटनात बसणेसाठी बेंच बसविणे ५नग	रु. २.९६
१४		बालउद्यान तयार करणे	रु. २०.००
१५		अव्हेंचर पार्क वनविणे	रु. १२.००
१६		सोलार पावर पॅक बसविणे	रु. १०.००
		एकुणः-	**रु. ८८.०१**

सदरहू पर्यटन स्थळाचा विकास करण्यासाठी एकूण **रु.८८.०१ लक्ष (अठ्ठयाऐंशी लक्ष एक हजार फक्त)** इतक्या रकमेस खालीलप्रमाणे उद्दीष्टनिहाय खर्च करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(रक्कम लाखात)

अ.क्र.	**पर्यटन स्थळाचे नाव**	**०२ मजुरी**	**२१ पुरवठा व सामग्री**	**५० इतर खर्च**	**एकूण**
१	औंढा नागनाथ	रु. ४४.००	रु. २२.००	रु. २२.०१	रु. ८८.०१

सदरहू शासकीय मान्यता खालील अटींच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

१. सोबत जोडण्यात आलेल्या विवरणपत्रामध्ये नमुद केलेली विकास कामे करण्यासाठी उपरोक्त निधी खर्ची टाकण्यात यावा.

२. शासन निर्णय संदर्भ क्र. ३ दि. १ डिसेंबर २०१६ अनुसार नियम पुस्तिकेच्या परिच्छेद ४.१ मध्ये नमुद केल्यानुसार निविदा प्रक्रियेत खरेदी किंमत रु. तीन लाख व त्यापेक्षा अधिक असल्यास ई-निविदा प्रणालीचा वापर करावा.

३. उपरोक्त खर्च विहीत कार्यपद्धतीनुसार तसेच अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर उपलब्ध मासिक निधी प्रवाहानुसार खर्च करण्यात यावा. यामध्ये कोणतीही वित्तीय अनियमितता होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.तसेच सदरहू विकासाची कामे सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात पूर्ण करण्यात यावीत. सदरहू रक्कम खर्ची पडल्यानंतर त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करावे.

४. प्रस्तावित कामातील बालोद्यान सुशोभीकरण, निरीक्षण मनोरा, माहिती फलक इ. कामांमध्ये निसर्गपूरक असलेले साहित्य (उदा.बांबू इ.) चा जास्तीत जास्त वापर करावा व त्या अनुषंगिकच निधी खर्ची पडेल याची दक्षता घ्यावी.

५. प्रस्तावित सर्व कामांना सक्षम प्राधिकारी यांची तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी आहे याची खात्री करुनच कामे करावीत. तसेच सदरहू कामे करताना वन (संवर्धन) कायदा १९८०, भारतीय वन अधिनियम १९२७, वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ मधील तरतुदींचा भंग होणार नाही तसेच सर्वोच्च न्यायालय/उच्च न्यायालय/केंद्र शासनाच्या व्याघ्र संवर्धन प्राधिकरण यांनी दिलेल्या मार्गदर्शक सुचना/आदेशांची अवहेलना होणार नाही याची सुद्धा दक्षता घ्यावी.

६. शासन निर्णयात नमुद कामासाठी इतर स्त्रोतातुन निधी घेण्यात येणार नाही व कामाची द्विरुक्ती होणार नाही याचे प्रमाणपत्र उपयोगिता प्रमाणपत्रासोबत द्यावे त्याशिवाय पुढील निधी उपलब्ध करुन दिला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

७. सदर प्रस्तावांतर्गत करावयाच्या कामाचा खर्च **रु.८८.०१ लक्ष (अठ्ठयाऐंशी लक्ष एक हजार फक्त)** सन २०१७-१८ साठी मागणी क्र. सी-०७-२४०६ वनीकरण व वन्यजीवन, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (०२)(०६) इको टुरिझम (राज्य) (२४०६-२२९५) या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

सदरहू शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७ /प्र.क्र.९४/अर्थ-३ दि.३० जून २०१७ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७११०२१७५००२५८१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sujay Dodal

Digitally signed by Sujay Dodal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=353112ee0fa47f9ff9bedae88f651d09fdb142df5fbce9c004f7eea06d8b9baf, cn=Sujay Dodal
Date: 2017.11.02 17:39:45 +05'30'

(सुजय दोडल)
सह सचिव (वने)
महसूल व वन विभाग

प्रति,

(१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) , महाराष्ट्र राज्य, नागपूर
(२) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) , महाराष्ट्र राज्य, नागपूर
(३) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन मंडळ, नागपूर
(४) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर
(४) मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), औरंगाबाद.
(५) महालेखापाल, १/२ (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखापरीक्षा), मुंबई/नागपूर.
(६) जिल्हा कोषागार अधिकारी, औरंगाबाद.
(७) कक्ष अधिकारी (व्यय-१०)(विनियम)/, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
(८) ब-१/फ-१ कार्यासन, महसूल व वन विभाग ,मंत्रालय, मुंबई.
(९) निवड नस्ती, फ-५